# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.09.2025** **वारःमंगळवार**

---

१. उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीत महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन विजयी

२.नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या सातव्या हप्त्याचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण,

३.म्हाडाचे लेआउट मंजूर करून त्यानुसार वसाहतींचा एकल किंवा समूह पुनर्विकास करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश.

आणि

४.आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा पहिला सामना दुबईमध्ये संयुक्त अरब अमिरातीशी

**<u>उपराष्ट्रपती</u>**

महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार सी.पी. राधाकृष्णन उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीमध्ये विजयी झाले आहेत. या पदासाठी काल झालेल्या निवडणुकीत राधाकृष्णन यांनी आपले प्रतिस्पर्धी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांचा १५२ मतांनी पराभव केला. या निवडणुकीत ७८१ पैकी ७६४ सदस्यांनी मतदान केलं. त्यामध्ये राधाकृष्णन यांना ४५२ तर बी. सुदर्शन रेड्डी यांना ३०० मतं मिळाली. नव्या संसद भवनात झालेल्या या पहिल्याच निवडणुकीत मतदान न करायचा निर्णय बिजू जनता दल आणि भारत राष्ट्र समिती या दोन पक्षांनी घेतला होता.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी राधाकृष्णन यांचं अभिनंदन केलं आहे. सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत भारतीय जनता पार्टीमध्ये अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. झारखंडच्या राज्यपाल पदाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली आहे.

**<u>मंत्रिमंडळ-निर्णय</u>**

उपसा जलसिंचन योजनांसाठीच्या वीज दर सवलतीला मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय काल राज्य मंत्रिमंडळानं घेतला. अतिउच्चदाब, उच्चदाब, आणि लघुदाब उपसा जलसिंचन, अशा सर्व प्रकारच्या १ हजार ७८९ योजनांना वीज दरात सवलत मिळत असल्यानं या मुदतवाढीचा लाभ सर्व शेतकरी सभासदांना होणार आहे. नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेअंतर्गत राज्यातील विविध महापालिकांना प्रकल्प पूर्ण करण्याकरिता स्वहिश्याचा निधी उभारण्याकरिता हुडकोकडून दोन हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास कालच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

**<u>नमो-शेतकरी</u>**

राज्य सरकारच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या सातव्या हप्त्याचं काल मुख्यमंत्री तसंच उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत वितरण करण्यात आलं. या योजनेअंतर्गत केंद्र सरकारच्या सहा हजार रुपये मदतनिधीला राज्य सरकारचे सहा हजार रुपये जोडून देण्यात येतात. तीन टप्प्यात या रक्कमेचं वितरण करण्यात येतं. ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकऱ्यांच्या खात्यावर एक हजार ८९२ कोटी ६१ लाख रुपये जमा झाल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यक्रमानंतर सांगितलं. ते म्हणाले,

देवेंद्र फडणवीस – बाईट – ४८ सेकंद

**<u>अजितपवार</u>** म्हाडा

पुणे, पिंपरी चिंचवडसह राज्यातील सर्व स्थानिक नियोजन प्राधिकरणांनी सुसज्ज रस्ते, सोयी - सुविधा असणारे म्हाडाचे लेआउट मंजूर करून त्यानुसार एकल किंवा समूह पुनर्विकास करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. पवार यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत; पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळाच्या विविध विषयांबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. पुणे म्हाडाच्या रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांच्या कामाचाही त्यांनी सविस्तर आढावा घेतला.

प्रधानमंत्री आवास योजना ही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. परवडणाऱ्या दरात सर्वसामान्यांना घरे उपलब्ध करून द्यावीत. मुंबईतील बी.डी.डी. चाळींच्या धर्तीवर बांधकामाचा दर्जा उत्तम ठेवून प्रकल्प वेळेत पूर्ण करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

**<u>स्वच्छवायू</u>**

स्वच्छ वायू सर्वेक्षण आणि पाणथळ शहरांच्या पुरस्कारांमध्ये अमरावतीला राष्ट्रीय पातळीवरचा पहिला पुरस्कार मिळाला आहे. ३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांच्या श्रेणीत हा पुरस्कार जाहीर झाला. केंद्रीय पर्यावरण मंत्री भुपेंदर यादव यांनी काल नवी दिल्लीत या पुरस्कारांचं वितरण केलं. इंदूर, जबलपूर, आग्रा, सुरत, या शहरांनाही विविध श्रेणीत पुरस्कार मिळाले. देशभरातल्या १३० शहरांमध्ये झालेल्या सर्वेक्षणानंतर हे पुरस्कार देण्यात आले. पुणे शहराने स्वच्छ वायू सर्वेक्षणामध्ये देशात दहावा क्रमांक मिळवला. गेल्या वर्षी पुण्याला २३वं स्थान मिळालं होतं. स्वच्छ हवा स्पर्धेत  नाशिक शहराचा देशात सोळावा तर राज्यात चौथा क्रमांक पटकावला आहे.

**<u>डार्क स्काय पार्क</u>**

इंट्रो  - जळगाव जिल्ह्यातील यावल वनविभागाच्या अंधारमळी परिसरात राज्यातील पहिलं 'डार्क स्काय पार्क' आकाराला येत आहे. ऐकूया त्याबाबतचा वृत्तांत ....

व्हॉईस कास्ट – ४७ सेकंद.

**<u>आरक्षण</u>**

मराठा आरक्षणाबाबत राज्य शासनाने काढलेला शासन निर्णय हा पुराव्यांशी संबंधित असून सरसकट नाही. कुणबी असल्याचे पुरावे असणाऱ्यांनाच त्याचा लाभ होणार आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षणाला कुठल्याही प्रकारे धक्का बसणार नाही, असं इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी काल स्पष्ट केलं. ओबीसी समाजाला शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन पूर्णपणे कटिबद्ध असून सर्व मागण्यांवर सकारात्मक चर्चा करून निर्णय घेतले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या विविध मागण्यांवर चर्चा करण्यासाठी सावे यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत बैठक झाली; त्यावेळी ते बोलत होते.

दरम्यान राज्य सरकारनं मराठा आरक्षणासंदर्भात २ सप्टेंबरला जारी केलेला जीआर, मागं घ्यावा, किंवा त्यात सुधारणा करून स्पष्टता आणावी, अशी मागणी राज्याचे मंत्री आणि अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे अध्यक्ष छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. तर, मराठा आरक्षणाबाबत मंत्रीमंडळ उपसमितीनं अतिशय विचार करुन निर्णय घेतले आहेत, त्यामुळे शासन निर्णय मागं घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असं या उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं आहे.

**<u>साहित्य</u>**

सातारा येथे होत असलेल्या 99व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक-अनुवादक चंद्रकांत भोंजाळ यांच्या नावाचा अग्रक्रमाने विचार व्हावा, अशी विनंती महाराष्ट्रातील अनुवादक संघानं केली आहे. अनुवादक संघांच्या मागणीस महाराष्ट्रातील विविध संस्था, संघटनांसह मराठी वाचनालयांनीही पाठींबा दर्शविला आहे, अशी माहिती लेखक-अनुवादक रवींद्र गुर्जर यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली.

**<u>मृत्यू</u>**

सांगली जिल्ह्यात तासगाव- भिलवडी मार्गावरील निमणी गावाजवळ काल चारचाकी आणि दुचाकीचा अपघात होऊन दुचाकीवरील तीन जणांचा मृत्यू झाला.

**<u>निधनखोखो</u>**

ज्येष्ठ खोखोपटू विजयकुमार उमराणीकर यांचं काल पुण्यात अल्पशा आजाराने निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते. सन्मित्र संघाचे उत्कृष्ट खो खो खेळाडू म्हणून त्यांनी विद्यापीठ, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धेसाठी प्रतिनिधित्व केलं. आज सकाळी वैकुंठ स्मशानभूमी इथं त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

**<u>क्रिकेट</u>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धा कालपासून संयुक्त अरब अमिरातीत सुरू झाली. यात भारताचा पहिला सामना आज दुबईत संयुक्त अरब अमिरात अर्थात यूएईच्या संघाशी तर येत्या १४ तारखेला पाकिस्तानबरोबर होणार आहे. अबूधाबी इथं काल अफगाणिस्तान आणि हाँगकाँग यांच्यात झालेल्या पहिल्या सामन्यात अफगाणिस्ताननं हाँगकाँग वर ९४ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्ताननं २० षटकांत ६ गडी बाद १८८ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल हाँगकाँगचा खेळ ९ गडी बाद केवळ ९४ धावा करु शकला. हा ब गटाचा पहिला सामना होता, श्रीलंका आणि बांगलादेशसंघाचाही ग्रुपबीमध्ये समावेश आहे. ग्रुपमधील अव्वल दोन संघ सुपर चार मध्ये प्रवेश करतील.

**<u>हवामान –</u>**

उद्या सकाळपर्यंतच्या अंदाजानुसार, विदर्भात अनेक ठिकाणी, कोकणात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**